# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्र.
०२०—२५६०१३५३
ई—मेल
iqac@unipune.ac.in

गणेशखिंड, पुणे ४११००७
अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष

संदर्भ क्र.:आयक्यूएसी/ 376

दि :— ०१ जुलै, २०१९

**अत्यंत महत्वाचे**

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख,
संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था/विद्यापीठ शैक्षणिक विभाग,
प्रस्तुत विद्यापीठ.

**विषय :— 'शैक्षणिक आणि संशोधन समन्वयक' (ARC) यांची माहिती ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याबाबत.**

महोदय/महोदया,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत **ASPIRE** संशोधन प्रकल्प योजना, विद्यार्थ्यांसाठी संशोधन स्पर्धा (अविष्कार, अन्वेषन) यासारखे उपक्रम राबविले जातात. सदर योजना/उपक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी प्रत्येक वर्षी बहुतांश महाविद्यालये/परिसंस्था/विद्यापीठ शैक्षणिक विभागामधील एका अध्यापकाचे 'शैक्षणिक आणि संशोधन समन्वयक' **(ARC)** म्हणून नामनिर्देशन करण्यात येते. त्याअनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०१९—२० साठी महाविद्यालये/परिसंस्था/विद्यापीठ शैक्षणिक विभागामधील एका अध्यापकाचे 'शैक्षणिक आणि संशोधन समन्वयक' **(ARC)** म्हणून नामनिर्देशन करण्यासाठी **ऑनलाईन** लिंक दिनांक २० जुलै, २०१९ पर्यंत सुरू असणार आहे.

तरी खालील नमूद केल्याप्रमाणे शैक्षणिक व संशोधन समन्वयकांचे नाव व बॅंक खात्यांची माहिती दिनांक २० जुलै, २०१९ पर्यंत **ऑनलाईन** पध्दतीने सादर करावी.

१. ज्या महाविद्यालय/परिसंस्था/विद्यापीठ शैक्षणिक विभागामधील पूर्णवेळ अध्यापकास यापूर्वीच 'शैक्षणिक व संशोधन समन्वयक' **(ARC)** म्हणून नामनिर्देशित केलेले आहे त्यांची सुध्दा माहिती **ऑनलाईन** पध्दतीने सादर करावी.

२. ज्या महाविद्यालय/परिसंस्था/विद्यापीठ शैक्षणिक विभागामधील अध्यापकाचे अद्याप 'शैक्षणिक व संशोधन समन्वयक' **(ARC)** म्हणून नामनिर्देशन केलेले नाही त्यांनी सदरचे नामनिर्देशन करून त्यांची माहिती सादर करावी.

**ऑनलाईन** पध्दतीने माहिती सादर करण्याची लिंक खालीलप्रमाणे आहे.

**http://bcud.unipune.ac.in/root/login.aspdx ➡College/Department login ➡ Nomination for ARC**

विद्यापीठ संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था/विद्यापीठ शैक्षणिक विभागामधील मा. प्राचार्य/संचालक/विभाग प्रमुखांनी नामनिर्देशित केलेल्या 'शैक्षणिक आणि संशोधन समन्वयक' **(ARC)** यांना विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयानुसार रू. ३०००/ इतके वार्षिक मानधन देण्यात येते ते मानधन 'शैक्षणिक व संशोधन समन्वयक' **(ARC)** यांच्या बॅंक खात्यावर थेट अदा करण्यात येणार असल्याने संबधित अध्यापकाच्या बॅंक खात्याची माहिती काळजीपूर्वक भरावी.

कळावे,

आपला,

(डॉ. प्रफुल्ल पवार)
संचालक
अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष